Vol 6 Issue 3 April 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# " प्रेमा तुझा रंग कसा " नाटकाची सार्वकालीन यशस्विता

दिलीप अलोणे



दिलीप अलोणे

**सारांश :-**

मराठी वाङ्मयातील कथा, लघुकथा, कादंबरी, काव्य, चरित्र, आत्मकथा या सर्व वाङ्मयाप्रकारापेक्षा नाटक या वाङ्मयप्रकाराचे स्थान वैशिष्टयपूर्ण असे आहे. नाटक हा दृकश्राव्य प्रकार असल्यामुळे नाटकाला प्रयोगाशिलता लाभलेली आहे. ते वाचताही येते आणि पाहताही येते. दोन्ही प्रकारे त्याचा आस्वाद घेता येतो. किंबहूना एखादा नाटककार नाटक लिहतो म्हणजे काय तर ते निव्वळ वाचनासाठी नव्हे तर त्यांचे रंगभूमीवर प्रयोगरुप यावे ही त्याची ईच्छा असतेच.

**प्रस्तावना :—**

नाटकाला 'काव्येषु नाटकं रम्यम्' असे म्हटले जाते. याचाच अर्थ असा की नाटक ही एक रम्य कलाकृती आहे. नाटकाला 'क्रीडनियक' असेही म्हटले आहे. क्रीडनियक म्हणजे खेळून दाखववायाचे काव्य आहे. जे काव्य डोळयांनी प्रत्यक्ष पाहता येते, पाहायचे असते ते काव्य म्हणजे नाटक होय. मराठी साहित्यात नाटक या वाङ्मयप्रकाराची परंपरा इतर प्रकारांप्रमाणे प्राचीन नसली तरी एक वैभवपूर्ण आणि दैदिप्यमान अशी धोर व अपूर्व परंपरा नाटकाला लाभलेली आहे. वास्तविक भारताच्या वाङ्मयीन परंपरेत संस्कृत भाषेतील नाटकांना एक महत्वपूर्ण स्थान होते. मात्र हया संस्कृत नाटकांची व नाटयकलेची जोपासना जशी व्हायला पाहिजे तशी झाली नाही किंवा या संस्कृत नाटकाच्या परंपरेतून मराठी नाटकाचे बिजारोपणही झाले नाही.



इ.स.1843 मध्ये श्री.विष्णूदास भावे, यांच्या ''सीता स्वरांवर'' या नाटकाने मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली—1860 पासून गद्यात्मक फार्स (प्रहसन) रंगभूमीवर सादर केल्या जाऊ लागले. ही ऐतिहासीक किंवा अद्‌भूतरसप्रधान होती. त्यानंतर पुस्तक रुपाने प्रसिध्द होणा—या बुकिश नाटकांचा प्रारंभ झाला. ही बुकिश नाटके एकतर इंग्रजी नाटकांचा अनुवाद असत किंवा सामाजिक विषयावरील ते भाष्य असत.

''थोरले माधवराव पेशवे'' या नाटकाचे लेखक श्री.वि.ज.किर्तने, हे मराठीचे आद्य नाटककार मानले जातात. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जिवनावर आधारीत किर्तने यांचे ते पहिले नाटक होय. त्यानंतर संस्कृत आणि इंग्रजी नाटकाच्या मराठी भाषांतराची लाट रंगभूमीवर आली.

अण्णासाहेब किर्लोस्करांनी प्रथमच मराठी नाटयसृष्टीतील संगीत नाटक लिहिले व रंगमंचावर आणले. त्यांच्या संगीत शाकुंतल, संगीत सौभद्र, संगीत सीता स्वयंवर या नाटकानी मराठी रंगभूमीला वैभव प्राप्त करुन दिले. त्यानंतर नाटयाचार्य गोविंद बल्लाळ देवल, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी यांनी 1920 पर्यतचा काळ आपल्या नाटकांनी समृध्द केला. मराठी रंगभूमीला समांतर बोलपटाचा काळ सुरु झाला आणि रंगभूमी झाकाळू लागली. त्यानंतर 1933 मध्ये नाटककार वर्तक यांनी 'नाटयमन्वंतर' नावांची संस्था स्थापून इब्सेनच्या नाटकाप्रमाणे वास्तवतेवर आधारीत नाविन्यपूर्ण नाटके रंगभूमीवर आणून मराठी नाटकांत प्राण ओतण्याचा प्रयत्न केला. 'आंधळयांची शाळा' 'लंपडाव' 'तक्षशिला' या नाटकांनी विषय, नाटयलेखन आणि नाटयतंत्र यामध्ये ख—या

अर्थाने मन्वंतर घडवून आणले. त्यानंतर आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, मो.ग.रांगणेकर, वि.वा.शिरवाडकर, पु.ल.देशपांडे, या नाटककारांच्या नाटकांनी रंगभूमीला एक आयाम देऊन गतवैभव प्राप्त करुन देण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला.

1950 ते 1960 च्या या दशकात नाटक रंगभूमीवर स्थिरावत असतांना ऐतिहासीक आणि सामाजिक अशी दोन्ही स्वरुपांची नाटके लिहून वसंत कानेटकर यांनी एक नवे वळण नाटकाला दिले. नाटकाची कथावस्तू, आशय, घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा, संवाद, मनोरंजन या सर्वच बाबतीत कानेटकरांनी आपले स्थान पक्के केले. 'रायगडाला जेव्हा जाग येते' 'इथे ओशाळला मृत्यू' या ऐतिहासीक नाटकांसोबतच 'देवांचे मनोराज्य' 'प्रेमा तुझा रंग कसा' 'वेडयाचे घर उन्हात' 'तुझा तू पावी राजा', 'मत्स्यगंधा', 'अश्रुंची झाली फुले', 'घरात फुलला पारिजात' 'मला काही सांगायचय' 'लेकुरे उदंड झाली' अशी निखळ मनोरंजना सोबत कौटूंबिक स्वरुपाची नाटके रंगभूमीला दिली. रंजनासोबत जीवनाचे आशयसुत्र मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि मराठी रंगभूमीवर प्रचंड अशी लोकप्रियता व मान्यता कानेटकरांनी मिळविली.

''प्रेमा तुझा रंग कसा'' हे 1961 साली रंगभूमीवर आलेले कानेटकरांचे एक महत्वपूर्ण नाटक. पहिल्या अंकापासुन शेवटी पडदा पडेपर्यंत कोणत्याही प्रकारचा भावनिक ताण निर्माण न होऊ देता रसिक मनोवृतिला रिझविण्याचे काम करीत निखळ आनंद देणारी ही सुरवांतिका होय. कोणत्याही सामाजिक समर्स्यने ग्रस्त नसलेले असे हे कानेटकरांचे सामाजिक म्हणन्यापेक्षा कौटूंबिक नाटक होय. विशेष असे कथानक या नाटकाला नाही परंतू प्रा.बल्लळ मार्तंड गुप्ते, प्रियवंदाबाई, बब्बड, बच्याजी बाजा, निळूभाऊ गोरे, कु.सुशिला या बहुरंगी पात्रांच्या स्वभाव, भावतरंगातून एक सामाजिक जीवनदृष्टी देण्याचा प्रयत्न कानेटकरांनी केला आहे. हा जिवनविषयक विचारही फार गुढ किंवा गहन नसून मनाला हळूवार स्पर्श करणारा आणि अंतकरणातून सुखावणारा, पुलकित करणारा असा हलकाफुलका आहे. सर्वसामान्य इतर नाटकाप्रमाणे या कथानकातील विविध धाग्यांची सांगड, प्रसंगातून निर्माण होणारी उत्कट गतीमानता वगैरे यात नाही तर घटना किंवा प्रसंगाना प्राधान्य देण्यापेक्षा मनुष्य स्वभावातील वैशिष्टयांना व कालमानाप्रमाणे हळूहळू होणा—या परिवर्तनाला महत्व दिले आहे. सहजसुलभ आनंददायी भाषाशैली, खेळकर स्वभावाचित्रणे गमतीदार प्रसंग आणि सिमित पात्रयोजना यातून प्रेम या सहजसुलभ व नैसर्गिक भावनेची विविध रुपे व वेगवेगळे रंग कानेटकर तेवढयाच सहजतेने अुथळताना दिसतात. वरवर वाटणारे प्रेमाचे रंग नाटकातील सुखद प्रत्ययामुळे अधिक गड्द होत जातात आणि कळतनकळत वायकांना एका तत्वज्ञानापाशी घेऊन जातात म्हणूनच एक यशस्वि नाटक म्हणून ''प्रेमा तुझा रंग कसा'' या नाटकाचा विचार करावा लागतो. मानवी जिवनातील प्रेमाचे महत्व आणि त्यातील वास्तव या नाटकातून प्रकट होते. प्रेम हे त्यागातून—सोसण्यातून व्यक्त होते, निर्माण होते अन्यथा प्रेमाचे रंग उडून जातात असा जीवनविषयक यथार्थ दृष्टीकोन नाटकातून व्यक्त केल्या जातो.

संपूर्ण नाटकात प्रा.बल्लाळ हीच मध्यवर्ती भूमिका किंबहूना तेच खरे तर या नाटकाचे सुत्रधार. प्रेम आणि आनंद यांच्या मनसोक्त उपभोगामुळे आणि व्यावहारीक तत्वचिंतनामुळे प्रा.बल्लाळ आयुष्यात सुखी व समाधानी आहेत. प्रियवंदाबाईशी प्रेमविवाह झाला असला तरी संसाराची पंचेविस वर्ष त्यांनी हसतखेळत काढली आहेत. त्यांची मुलगी बब्बड हिचे कोळसा वखारीचा उद्योग करणारे निळूभाऊ यांचा मुलगा बाजीराव उर्फ बाज्यावर प्रेम आहे. त्यांची पत्नी प्रियवंदाबाई हिचा या प्रेमाला विरोध असतानाही तिच्या विरोधात ते या विवाहाला संमती देतात. आंधळे प्रेम आणि व्यवहारीक संसार याची कल्पना देत ते बब्बड आणि बाजीराव यांच्या विवाहानंतर त्यांच्यांत होणारे मतभेद व घटस्फोटापर्यत येऊन ठेपणारी ही भानगड हसतखेळत सोडवतात. बब्बड आणि बाजीराव यांचे वैवाहीक जिवन आपल्यासारखेच सुखी व्हावे यासाठीच त्यांचा प्रयत्न असून माहेरी निघून आलेल्या बब्बडला परत सासरी जाण्यासाठीच प्रवृत करतात. प्रेमभंगामुळे त्यांचा मुलगा बच्याजीच्या मनांत स्त्रियाबद्दल निर्माण झालेला व्देष हळूवारपणे प्रा.बल्लाळ बाजूला काढतात. सुशीलेच्या प्रेमभंगातही ते आयुष्यातले सत्य बच्याजीच्या पुढे करतात. इतकेच नव्हेतर बच्याच्या मनाला धीर देतात. सुशीलेच्या निनावी पत्रातून निर्माण झालेला संशय मोठया चतुराईने सोडवतात. प्रेमाच्या आड येत असलेला सुशीलेचा अहंकार आणि करिअर व प्रेम यांच्या सीमारेखा प्रा.बल्लाळ दाखवून देतात. पतीचे घर सोडून देऊन बब्बडने केलेली चुक तिच्या लक्षात आणून देऊन यशस्वि प्रेमासाठी समर्पण कसे महत्वाचे आहे हे तिला पटवून देतात.

नाटयवेध या ग्रंथात समीक्षक डॉ.द.भि.कुळकर्णी म्हणतात की, प्रेम या महत्वपुर्ण मानवी अनुभवाकडे लेखकाने आपणास प्रा. बल्लाळांच्या नजरेने पाहावयास लावले आहे. प्रा.बल्लाळांना दिसते की, माणसे ''प्रेम, प्रेम'' असे तोंडाने म्हणत स्वतः वरच प्रेम करीत असतात. आणि ते खरे आहे. या नाटकातील प्रा.बल्लाळ वगळता इतर सर्व पात्रे आत्यकेंद्री आहेत. ती स्वतः ला नीट ओळखू शकत नाहीत ती इतरांनाही नीट ओळखू शकत नाहीत उलट प्रा.बल्लळ आत्ममुग्ध नाहीत. सारा मीपणा सहज बाजूला सारुन ठेवत ते जीवनात आत्मनिरपेक्ष प्रेम करतात. प्रा.बल्लाळ स्वतः मध्ये रंगले आहेत पण स्वतः वर प्रेम करणारे नाहीत. इतरांवर प्रेम करणारे आहेत पण त्यांना परतंत्र करणारे नाहीत म्हणूनच ते स्वतःसकट सगळयांना जाणू शकतात, समजू शकतात.

अट्ठाविस वर्षापुर्वी तारुण्याच्या उंबरठयावर प्रा.बल्लाळ जसे होते तसेच ते आज अट्ठाविस वर्षानंतर आहेत. ही त्यांची आत्ममग्नता. ते स्वतःचे स्वातंत्र्य जपतात तसेच इतरांचेही, आयुष्यातील प्रत्येक व्यक्तिला आत्मनिरपेक्ष महत्व व स्थान देतात. दुस—याचे स्वातंत्र्य क्षणोक्षणी जपणे हीच त्यांची प्रेमाची व्याख्या असावी आणि म्हणूनच स्थिर असणारे प्रा.बल्लाळ क्षणाक्षणाला बदलतात आणि प्रत्येक क्षणाला निरपेक्ष न्याय देतात. दुस—याच्या अस्तित्वाचा आणि स्वातंत्र्याचा आदर करण्यासाठी ते क्षणाक्षणाला बदलत असतात. त्यांचा मिस्किलपणा, विसरभोळेपणा त्यांची भेदकता, काव्यमता, त्यांचा समजूतदारपणा या सा—यांचे मूळ या त्यांच्या आत्मलीन तरीही जीवनाभिमूख जीवनाचा आदर करणा—यांच्या वृतीत आहे. प्रा.वसंत कानेटकरांनी या नाटकात प्रा.बल्लाळ या मध्यवर्ती भूमिकेच्या व्यक्तिरेखेला अनेक पैलू प्रदान केले आहेत.

वयाची पन्नाशी उलटलेले प्रा.बल्लाळ तत्वज्ञान आणि मानसशास्त्र या विषयात रमणारे असून त्यांच्यात विव्दत्ता आहे. पण कांहीसे अव्यवस्थित आहेत. स्वभाव मोकळा आणि दिलखुलास आहेत. जीवनात मिळालेल्या प्रेमामुळे आणि आनंदामुळे ते मनस्वी खुष आहेत. जीवनाचा मनसोक्त उपभोग त्यांनी घेतला. ''चौवनाचे सगळे रागरंग आपण मनमुराद लुटले नाहीत कां,? लुटले, अगदी आकंठ भोगले, तृप्त आहोत, खुष आहोत आपण ।'' अशी त्यांची भुतकाळाकडे पाहण्याची जीवनदृष्टी आहे. तारुण्याची ती वेळ आता संपल्याची जाणीवही त्यांना आहे. नाटकातील विविध प्रसंगात प्रा.बल्लाळ यांची प्रगल्भता दिसून येत असून ते सतत नव्या पिढीला प्रखर वास्तवाची जाणीव करुन देत असतात. एरव्ही मवाळ वाटणारे प्रा.बल्लळ कांही प्रसंगात कठोर आणि कणखरही वाटतात.

तरुण वयातील प्रेमाची भावना केवळ आकर्षणापोटी निर्माण होत असून वास्तव जीवनातील सुख—दुख जाणूनच या मार्गाचा शोध

घेतला पाहिजे. प्रत्येक पिढीतील तरुणाईची प्रेम ही सहजसुलम नैसर्गिक भावना असून त्यांला मागची पिढी विरोध करीत असते ही सर्वकालीन ऐतिहासीक परंपरा आहे. यावर भाव्य करताना प्रा.बल्लळ म्हण्तात– '' हे नाटक कधीच संपायच नाही. जगाच्या प्रारंभी या नाटकाला सुरवात झालीय आणि जगाच्या पाठीवर जोपर्यत स्त्री–पुरुष आहेत तोपर्यत या नाटकाचे नवे नवे अंक असेच रंगत जाणार'' हेच आशयसुत्र प्रा.वसंत कानिटकरांनी ''प्रेमा तुझा रंग कसा'' या नाटकातून सहज, हसत खेळत हलक्या फुलक्या प्रसंग घटनातून परिणामकारकरित्या मांडले आहे. सर्वसामान्याच्या जीवनाशी निगडीत या कथासुत्राने हे नाटक सार्वकालीन एक यशस्वी नाटक म्हणून चर्चिल्या गेले.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org